# ‘कोसला’कार डॉ. भालचंद्र नेमाडे यांचे सर्व साहित्य आता ‘ई-बुक’ मध्ये

**मुंबई, २३ ऑगस्ट / प्रतिनिधी**



‘कोसला’कार डॉ. भालचंद्र नेमाडे यांचे सर्व साहित्य आता ‘ई-बुक’ स्वरूपात उपलब्ध होणार असून या साहित्याच्या ई-बुकचे प्रकाशन येत्या २८ ऑगस्ट रोजी मुंबईत दादर येथे एका कार्यक्रमात होणार आहे. मंदार जोगळेकर यांच्या ‘बुकगंगा डॉट कॉम’तर्फे हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

बुकगंगा डॉट कॉम या संकेतस्थळावरून सध्या जगभरातील चोखंदळ साहित्यप्रेमींना भारतीय साहित्यातील उत्तमोत्तम पुस्तके उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ‘बुकगंगा डॉट कॉम’ने विकसित केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे ‘ई-बुक’च्या माध्यमातून भारतीय भाषेतील साहित्य आपल्या संगणकावर किंवा आयपॉडवर डाऊनलोड करून वाचन करणे सुलभ झाले आहे.

नेमाडे यांच्या ‘कोसला’सह ‘बिढार’, ‘जरिला’, ‘झुल आणि हूल’ आणि सध्या चर्चेत असलेली ‘हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ’ आदी साहित्य आता ई-बुक स्वरूपात उपलब्ध होणार आहे. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते या सर्व ई-बुक

आवृत्यांचे प्रकाशन होणार असून या वेळी शशिकांत सावंत नेमाडे यांच्याशी संवाद साधणार आहेत.

हा कार्यक्रम सायंकाळी सात वाजता पु. ल. देशपांडे कला अकादमी, तिसरा मजला, रवींद्र नाटय़ मंदिर, प्रभादेवी येथे होणार आहे.